RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक १६६ (६)] बुधवार, ऑक्टोबर २८, २०२६/ कार्तिक ६, शके १९४८ [पृष्ठे १६१, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ५९८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

ऊर्जा विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६.

क्रमांक मुविनि-२०२५/प्र.क्र.५५/ऊर्जा-१.— महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (२०१८ चा महा. १५) याच्या कलम ३७ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांची अंमलबजावणी करण्याकरिता पुढील नियम तयार करीत आहे :—

१. संक्षिप्त नाव- या नियमांस, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६ असे म्हणावे.

२. व्याख्या- (१) या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (२०१८ चा महा. १५), असा आहे;

(ख) "जोडपत्र" याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेले जोडपत्र, असा आहे;

(ग) "नमुना" याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेला नमुना, असा आहे;

(घ) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचा कलम, असा आहे.

(२) या नियमांत वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांचा अर्थ, अनुक्रमे अधिनियमात किंवा भारतीय मानक संस्थेच्या कार्यपद्धती संहितेत त्यांनी नेमून दिल्याप्रमाणेच असेल.

३. मुख्य विद्युत निरीक्षक, अधीक्षक अभियंता, विद्युत निरीक्षक व सहाय्यक विद्युत निरीक्षक म्हणून नियुक्तीकरिता शैक्षणिक अर्हता—

(१) मुख्य विद्युत निरीक्षक- अशा व्यक्तीची, मुख्य विद्युत निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येणार नाही,-

(एक) ज्या व्यक्तीने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदवी धारण केलेली

	नसेल; आणि (दोन) जी विद्युत अभियांत्रिकीच्या सेवेमध्ये किमान वीस वर्षांच्या कालावधीकरिता नियमितपणे कार्यरत नसेल. (२) अधीक्षक अभियंता- अशा व्यक्तीची, अधीक्षक अभियंता म्हणून नियुक्ती करता येणार नाही,- (एक) ज्या व्यक्तीने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदवी धारण केलेली नसेल; आणि (दोन) जी विद्युत अभियांत्रिकीच्या सेवेमध्ये किमान पंधरा वर्षांच्या कालावधीकरिता नियमितपणे कार्यरत नसेल. (३) विद्युत निरीक्षक- अशा व्यक्तीची, विद्युत निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येणार नाही,- (एक) ज्या व्यक्तीने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदवी धारण केलेली नसेल; आणि (दोन) जी विद्युत अभियांत्रिकीच्या सेवेमध्ये किमान दहा वर्षांच्या कालावधीकरिता नियमितपणे कार्यरत नसेल. (४) सहाय्यक विद्युत निरीक्षक.- अशा व्यक्तीची, सहाय्यक विद्युत निरीक्षक म्हणून नियुक्ती करता येणार नाही,- (एक) ज्या व्यक्तीने मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदवी धारण केलेली नसेल; आणि (दोन) जी विद्युत अभियांत्रिकीच्या सेवेमध्ये किमान तीन वर्षांच्या कालावधीकरिता नियमितपणे कार्यरत नसेल, ४. विद्युत निरीक्षक आणि सहाय्यक विद्युत निरीक्षक यांना सहाय्य करण्यासाठी तांत्रिक आणि इतर व्यक्तींची नियुक्ती करण्याकरिता शैक्षणिक अर्हता- (१) सहाय्यक अभियंता-ज्या व्यक्तीने, मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून

विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदवी धारण केलेली नसेल अशा व्यक्तीची, विद्युत निरीक्षकाला आणि सहाय्यक विद्युत निरीक्षकाला सहाय्य करण्यासाठी, सहाय्यक अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

(२) शाखा अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता- ज्या व्यक्तीने, मान्यताप्राप्त संस्थेतून विद्युत अभियांत्रिकी किंवा तिच्याशी समतुल्य असलेली पदविका किंवा पदवी धारण केलेली नसेल अशा व्यक्तीची, विद्युत निरीक्षकाला आणि सहाय्यक विद्युत निरीक्षकाला सहाय्य करण्यासाठी, शाखा अभियंता किंवा कनिष्ठ अभियंता म्हणून नियुक्ती करण्यात येणार नाही.

५. उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याची परवानगी-

(१) एखाद्या जागेत उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याचा इरादा असणारा, अशा जागेचा प्रत्येक मालक:-

(एक) अशा जागेत उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारील, किंवा

(दोन) अशा जागेत उभारलेले उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यामध्ये वाढीव काम करणे किंवा त्यात फेरफार करील,

उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यामध्ये वाढीव काम करणे किंवा यथास्थिति, त्यात फेरफार करणे या संबंधातील कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी उद्वाहनाकरिता नमुना क मध्ये व सरकता जिना किंवा यथास्थिति, सरकता मार्ग याकरिता नमुना ख मध्ये विद्युत निरीक्षकास अर्ज करील.

(२) अशा प्रत्येक अर्जासोबत उभारणी आराखडासह खालील कागदपत्रांचा अंतर्भाव करण्यात येईल:-

(क) नमुना ग मधील वास्तूविशारद प्रमाणपत्र;

(ख) नमुना घ मधील संरचनात्मक अभियंता प्रमाणपत्र;

(ग) उद्वाहन, सरकता जिना किंवा यथास्थिति, सरकता मार्ग याकरिता कंत्राटदाराने मान्यता दिलेले नमुना ड मधील घोषणापत्र;

(घ) मालक व मान्यताप्राप्त कंत्राटदाराने यथोचितरीत्या, स्वाक्षरी केलेले उद्वाहन, सरकता जिना किंवा यथास्थिति, सरकता मार्ग उभारण्याचा तांत्रिक नकाशा;

(ड) मुखत्यारपत्र.

(३) अशा प्रत्येक अर्जासोबत **शासन राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शासन, कलम ४ अन्वये विनिर्दिष्ट करील असे शुल्क देखील भरलेले असेल. शुल्क, शासकीय पावती लेखांकन पद्धती किंवा ई-प्रदानाच्या माध्यमातून शासकीय कोषागारामध्ये किंवा भारतीय रिझर्व बँकेमध्ये भरण्यात येईल.

(४) पोट-नियम (१) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यावर व त्याला अर्जदाराने माहिती सादर केल्यावर, त्याच्या अभिप्रायांसह अर्ज व रीतसर भरलेला पडताळणी नमुना (उद्वाहनासाठी नमुना च आणि सरकते जिने व सरकते मार्गासाठी नमुना छ) संबंधित अधीक्षक अभियंत्याकडे पाठवील, त्यानंतर संबंधित अधीक्षक अभियंता केलेल्या अर्जावर परवानगी एकतर, मान्य करतील किंवा नाकारतील. उद्वाहनासाठी नमुना ज मध्ये आणि सरकते जिने व सरकते मार्गासाठी नमुना झ मध्ये परवानगी दिली जाईल. दिलेली परवानगी ही एक वर्षाच्या कालावधीकरिता वैध असेल. संरचनात्मक स्थायित्व प्रमाणपत्राच्या सादर करण्याच्या अधिन राहून, वैधतेचा कालावधी वाढविण्यात येईल.

६. उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्यासाठी, त्यांचे परिरक्षण करण्यासाठी विद्युत कंत्राटदाराला अनुज्ञप्ती देणे,-

(१) उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारण्यासाठी व त्याच्या परिरक्षणासाठी अनुज्ञप्ती मिळविण्याचा हेतू असणारी व वीज अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) अन्वये तयार केलेल्या केंद्रीय विद्युत प्राधिकरण सुरक्षा व विद्युत पुरवठा यासंबंधी उपाययोजना विनियम, २०२३ याच्या तरतुदींन्वये घटित करण्यात आलेल्या अनुज्ञापक मंडळाने दिलेली वैध विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्ती असणारी कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींची संस्था किंवा निगम निकाय, **शासन राजपत्रात** शासनाने कलम ५ अन्वये अधिसूचित केल्याप्रमाणे विहित करण्यात येईल अशा

	नमुन्यात विद्युत निरीक्षक याच्याकडे अर्ज शुल्कासहित नमुना त्र मध्ये अर्ज करील आणि पुढील कागदपत्रे सादर करील:- (क) वैध विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्तीची स्वयं-साक्षांकित छायाचित्र प्रत; (ख) कार्यशाळा, कार्यालय परिसर, विद्युक देयक व दूरध्वनी देयकांची कागदपत्रे; (ग) अर्हतेच्या छायाचित्र प्रतींसह नमुना ट मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्मचाऱ्यांची यादी व कंत्राटदाराने पडताळणी केलेले अनुभव प्रमाणपत्र; (घ) कंत्राटदाराने त्याचे कर्मचारी इतर कोणत्याही संस्थेत कार्यरत नाहीत असे जाहीर केलेले घोषणापत्र; (ङ) उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग याच्या उभारणीसाठी आणि परिरक्षणासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या सुट्या भागांची यादी; (च) उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग याच्या उभारणीसाठी आणि परिरक्षणासाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली साधने आणि संयंत्रे यांची यादी; (छ) वाहतुकीसाठी ताब्यात असलेल्या वाहनाच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती; (ज) दुकान व आस्थापना अनुज्ञप्तीची एक छायांकित प्रत; (झ) तांत्रिक कर्मचारी वर्गाकरिता प्रशिक्षणाची तरतूद करण्यासाठी सुविधा दर्शविणारी कागदपत्रे. (२) उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग याच्या उभारणीसाठी आणि परिरक्षणासाठी अनुज्ञप्ती मिळविण्याकरिता विद्युत कंत्राटदाराकडे,- (एक) महाराष्ट्र राज्यातील स्वतंत्र दूरध्वनी जोडणीसह स्वतंत्र कार्यालय परिसर असावा: परंतु, एखाद्या शहरात किंवा नगरात जेथे परिरक्षणाखालील उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग यांची संख्या ५० पेक्षा जास्त असल्यास किंवा अशी उद्वाहने कंत्राटदाराच्या मुख्य कार्यालयापासून १०० किलोमीटर पेक्षा अधिक अंतरावर असल्यास, कंत्राटदाराद्वारे त्या शहरात किंवा नगरात,

UNCOMPLYCAT Simplifying compliance

	वेळेवर परिरक्षण व आपत्कालीन सेवा पुरविण्यासाठी आवश्यक सुविधा असलेले अतिरिक्त सेवा केंद्र प्रस्थापित केले जाईल; (दोन) त्याला कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेकडून किंवा भारतीय रिझर्व्ह बँकेने मान्यता दिलेल्या बँकेकडून किंवा तहसीलदाराकडून, तो पाच लाख रुपयांच्या मर्यादेपर्यंत ऐपतदार आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल; (तीन) त्याच्या नियमित सेवेत किमान पुढील कर्मचारी असावेत,- (क) महाराष्ट्र राज्य अनुज्ञापक मंडळाकडून विद्युत पर्यवेक्षक अनुज्ञप्ती धारण करणारा आणि अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा यथास्थिति, कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेला किमान एक विद्युत पर्यवेक्षक. (ख) किमान एक अभियंता ज्याने,- (एक) मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून यांत्रिक अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी पदवी धारण केलेली असावी आणि ज्याला अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असावा; किंवा (दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून यांत्रिक अभियांत्रिकी शाखेतील पदवीका किंवा तिच्याशी समतुल्य असणारी अर्हता धारण केलेली असावी आणि ज्याला अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान आठ वर्षांचा अनुभव असावा; किंवा (ग) किमान एक अभियंता ज्याने,- (एक) मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत किंवा

UNCOMPLYCATE Simplifying compliance

	इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी शाखेतील पदवी किंवा तिच्याशी समतुल्य असणारी पदवी धारण केलेली असावी आणि ज्याला अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने , सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असावा; (दोन) मान्यताप्राप्त विद्यापीठ किंवा संस्थेतून विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी शाखेतील पदविका किंवा तिच्याशी समतुल्य असणारी अर्हता धारण केलेली असावी आणि ज्याला अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने , सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान आठ वर्षांचा अनुभव असावा; (घ) औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा शासनाद्वारे मान्यता मिळालेल्या इतर कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेतून विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक्सच्या व्यवसाय प्रशिक्षण संस्थेचे प्रमाणपत्र धारण करणारी आणि अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किमान एक व्यक्ती; (ङ) उद्वाहन, सरकता जिना व सरकते मार्गासाठी, एका वर्षाच्या कालावधीत उभारण्यात येणाऱ्या पंचवीस नवीन उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गांसाठी एक उभारणी करणारा गट असेल ज्यामध्ये,- (एक) अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेला एक वरिष्ठ उभारणीकार; (दोन) अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमध्ये उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेला एक कनिष्ठ उभारणीकार;

(तीन) एक मदतनीस,

यांचा समावेश असेल.

(च) उद्वाहन, सरकता जिना व सरकता मार्गाच्या परिरक्षणासाठी, एका वर्षाच्या कालावधीत परिरक्षणासाठी असलेल्या पन्नास उद्वाहन किंवा सरकता जिना व सरकत्या मार्गाकरिता एक देखभाल जोडी असेल, ज्यामध्ये अनुज्ञप्तीधारक भागीदारी संस्था किंवा कंपनीमधील क्षेत्रात किमान पाच वर्षांचा अनुभव असलेल्या एका मेकॅनिकचा समावेश असेल:

(छ) उद्वाहन मालकांकडून येणाऱ्या तक्रारी व आपत्कालीन कॉल्स स्वीकारण्यासाठी आणि त्यांना त्वरित प्रतिसाद देण्यासाठी सेवा केंद्रावर २४/७ कॉल हजेरी सेवा उपलब्ध करून देणे:

परंतु, जेव्हा या नियमांतर्गत अनुज्ञप्तीसाठी अर्ज करणारी व्यक्ती, स्वतः आवश्यक अनुभवासह अर्हताप्राप्त यांत्रिक किंवा विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक्स अभियंता असेल, तेव्हा दुसऱ्या यांत्रिक किंवा विद्युत किंवा इलेक्ट्रॉनिक्स अभियंत्याची आवश्यकता असणार नाही;

(चार) त्याच्या स्वत:च्या ताब्यातील किंवा विहित करारनाम्यातील भाड्याच्या आधारावर स्वतंत्र सुविधांसह किमान १०० चौरस मीटर क्षेत्र असलेली आणि दूरध्वनी व किमान १५ अश्वशक्तीची (एच.पी.) स्वतंत्र विद्युत जोडणी असलेली एक कारखाना किंवा तंत्रशाळा असावी. अशा तंत्रशाळेत पुढील किमान सुसज्ज यंत्रसामग्री व चाचणी उपकरणे एकतर स्थिर किंवा सुवाह्य स्वरूपात असावीत:-

(क) वेधणी;

(ख) सांधण यंत्र;

(ग) धातू कापण्याची करवत;

(घ) साखळी कप्प्या:

परंतु, जर मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडे त्याचे स्वत:चा कारखाना असेल तर त्याच्याकडे एक स्वतंत्र तंत्रशाळा असण्याची आवश्यकता नसेल परंतु, वर नमूद केल्याप्रमाणे त्याच्याकडे किमान यंत्रसामग्री व

UNCOMPLYCAT Simplifying compliance

	उपकरणे आवश्यक असतील. (पाच) परिरक्षणाच्या व उभारणीच्या कामात गुंतलेल्या संपूर्ण कर्मचारीवर्गासाठी सुरक्षा पट्टा व शिरोवेष्टन यांसारखे सुरक्षा कळयंत्रे आवश्यक असतील. (सहा) परिरक्षणासाठी त्याच्या ताब्यात स्वतंत्र सोईस्कर वाहन असावे. (३) असा अर्ज प्राप्त झाल्यानंतर विद्युत निरीक्षक यांस आवश्यक असेल अशी माहिती सादर करण्यास अर्जदाराला फर्मावता येईल. विद्युत निरीक्षकास आवश्यक वाटल्यास कार्यालय व कारखाना/तंत्रशाळा जागेचे निरीक्षण करील व अशी इतर चौकशी केल्यानंतर आणि अर्जदाराने आवश्यक अशी आणखी माहिती पुरविल्यानंतर अर्ज पुढे अधीक्षक अभियंत्यांकडे त्याच्या अभिप्रायासह पाठवील. अधीक्षक अभियंता त्यानंतर एकतर अनुज्ञप्ती देतील किंवा नाकारतील. सदर अनुज्ञप्ती नमुना ठ नुसार मंजूर करण्यात येईल. (४) अनुज्ञप्तीधारक या नियमांन्वये दिलेल्या अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करण्यासाठी संबंधित विद्युत निरीक्षकामार्फत अधीक्षक अभियंत्याला अर्ज करील. सदरचा अर्ज, शासनाने **शासकीय राजपत्रात** कलम ५ च्या पोट-कलम (५) अन्वये अधिसूचित करील अशा शुल्कासह आणि वरील पोट-नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कागदपत्रांसह, अनुज्ञप्तीची किंवा यथास्थिती, नूतनीकरण केलेल्या अनुज्ञप्तीची मुदत समाप्त होण्याच्या दिनांकाच्या किमान तीस दिवस अगोदर नमुना ड मध्ये सादर करण्यात येईल. अनुज्ञप्तीधारकाकडून ज्या उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे परिरक्षण केले जात आहे, अशा उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या किमान दहा मालकांकडून, अनुज्ञप्तीधारकाने, उद्वाहन, सरकता जिना किंवा यथास्थिती, सरकता मार्ग चांगल्या स्थितीत परिरक्षित ठेवला असल्याचे नमूद करणारे प्रमाणपत्र देखील अर्जदाराने सादर केले पाहिजे. (५) पोट-नियम (४) अन्वये केलेला अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक, अर्जदाराच्या कार्यालयाच्या व कारखाना/तंत्रशाळेच्या जागेचे प्रत्यक्ष निरीक्षण केल्यानंतर व त्यास आवश्यक वाटेल अशी अन्य चौकशी केल्यानंतर आणि अर्जदाराकडून सादर करणे आवश्यक असेल अशी आणखी माहिती मिळवल्यानंतर,

UNCOMPLYCATE Simplifying compliance

तो अर्ज आपल्या अभिप्रायासह अधीक्षक अभियंत्यांकडे पाठवील. अधीक्षक अभियंता, अर्जाचा व विद्युत निरीक्षकांच्या अभिप्रायांचा विचार केल्यानंतर, अनुज्ञप्तीचे नूतनीकरण एकतर मंजुरी देतील किंवा नाकारतील. जेव्हा नूतनीकरण मंजूर केले जाईल, तेव्हा अधीक्षक अभियंता नमुना ठ मध्ये अनुज्ञप्तीचे नूतनीकरण करतील.

(६) जर मान्यताप्राप्त कंत्राटदाराने मुदत समाप्तीच्या दिनांकाच्या उपरोक्त कालावधीत उक्त रीतीने आवश्यक दस्तऐवजांसह अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणासाठी अर्ज करण्यात कसूर केली, तर ती अनुज्ञप्ती रद्दबातल ठरेल आणि मान्यताप्राप्त कंत्राटदारास पोट-नियम (१) अन्वये नवीन अनुज्ञप्ती प्राप्त करून घेणे आवश्यक असेल.

७. उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्याची अनुज्ञप्ती देण्यापूर्वी प्रारंभिक निरीक्षण आणि उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू करण्याची अनुज्ञप्ती.-

(१) ज्या जागेच्या मालकास अशा जागेत उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याची किंवा बसविण्याची परवानगी देण्यात आली असेल, असा प्रत्येक मालक, असे उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग संबंधित घटक उभारणी किंवा बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर, एका महिन्याच्या आत, नमुना ढ मध्ये अशा उभारणीची किंवा बसविल्याची लेखी नोटीस विद्युत निरीक्षकास देईल किंवा पाठवील किंवा देण्याची अथवा पाठविण्याची व्यवस्था करील, आणि उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालविण्याच्या किंवा वापरण्याच्या अनुज्ञप्तीकरिता त्याच्याकडे अर्ज करील.

(२) अशा प्रत्येक अर्जासोबत, शासनाद्वारे, कलम ७ च्या पोट-कलम (२) अन्वये **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेले शुल्क व पुढील कागदपत्रांचा संच जोडलेला असेल:-

(क) नमुना ण मधील, उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर मान्यताप्राप्त कंत्राटदाराचे घोषणापत्र ;

(ख) चाचणी अहवाल, (उद्वाहनासाठी नमुना त मधील आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना थ मधील) ;

(ग) कलम ७ च्या पोट-कलम (६) अन्वये मान्यताप्राप्त कंत्राटदाराचे प्रमाणपत्र ;

(घ) शुल्क भरल्याची पावती ;

(ङ) निरीक्षण अहवाल (उद्वाहनासाठी नमुना द मधील आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना ध मधील).

(३) पोट-नियम (१) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर,-

(एक) विद्युत निरीक्षक अर्जदाराला नमुना न मध्ये निरीक्षणाची नोटीस पाठवतील आणि प्रत्यक्ष निरीक्षण करतील.

(दोन) जर विद्युत निरीक्षकास असे आढळून आले की, उद्वाहन, सरकता जिना किंवा यथास्थिती, सरकता मार्ग हे भारतीय मानक संस्थेच्या (बीआयएस) संबंधित संहितेमध्ये विहित केलेल्या मानकांशी अनुरूप आहेत, तर तो, तो अर्ज, आपले अभिप्राय आणि विहित नमुन्यातील (उद्वाहनासाठी नमुना प आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना फ) निरीक्षण अहवालासह संबंधित अधीक्षक अभियंत्याकडे पाठवील.

(तीन) जर विद्युत निरीक्षकास उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यामध्ये काही दोष आढळून आला किंवा ते भारतीय मानक संस्थेच्या (बीआयएस) संहितेमध्ये विहित केलेल्या मानकांशी अनुरूप नसल्याचे आढळून आले, तर तो त्या त्रुटींविषयी अर्जदारास नमुना ब मध्ये कळवील. त्रुटींचे निवारण केल्यावर आणि अनुपालनाची पडताळणी झाल्यावर, विद्युत निरीक्षक, सदरचा अर्ज, आपल्या अभिप्रायांसह व निरीक्षण अहवालासह, संबंधित अधीक्षक अभियंत्याकडे पाठवील.

(४) अर्ज प्राप्त झाल्यानंतर, अधीक्षक अभियंता, नियम ९ च्या तरतुदींच्या अधीन राहून, उद्वाहनासाठी नमुना भ मध्ये आणि सरकत्या जिन्यासाठी व सरकत्या मार्गासाठी नमुना म मध्ये एकतर अनुज्ञप्ती मंजूर करतील किंवा नाकारतील.

(५) उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग चालविण्यासाठी दिलेली अनुज्ञप्ती, ती ज्या दिनांकास दिली असेल, त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल.

	(६) अनुज्ञप्तीच्या कालावधीची मुदत समाप्त होण्यापूर्वी, किमान तीस दिवस अगोदर, अनुज्ञप्तीधारक, अनुज्ञप्तीच्या नूतनीकरणाकरिता उद्वाहनासाठी नमुना य मध्ये आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना यक मध्ये, कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये शासनाने **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेले शुल्क व पुढील कागदपत्रांसह अर्ज करील :- (क) नमुना ग मधील वास्तुविशारद प्रमाणपत्र; (ख) नमुना घ मधील **संरचनात्मक अभियंत्याचे प्रमाणपत्र**; (ग) शुल्क भरल्याची पावती ; (घ) उद्वाहनासाठी नमुना त मधील आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना थ मधील चाचणी अहवाल ; (ङ) कलम ७ च्या पोट-कलम (६) अन्वये मान्यताप्राप्त कंत्राटदाराचे प्रमाणपत्र ; (च) मागील वर्षाचे निरीक्षण शुल्क भरल्याची पावती ; (छ) उद्वाहनासाठी नमुना द मधील आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना ध मधील निरीक्षण अहवाल ; (ज) मूळ अनुज्ञप्ती. (७) पोट-नियम (४) अन्वये नूतनीकरणाचा अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक नमुना न मध्ये निरीक्षणासाठी नोटीस बजावतील आणि प्रत्यक्ष निरीक्षण करतील. जेथे काही त्रुटी आढळून येतील, तेथे विद्युत निरीक्षक अर्जदारास असे त्रुटीपत्र नमुना ब मध्ये कळवतील किंवा विद्यमान संचमांडणीच्या श्रेणीवर्धनासाठी भारतीय मानक संस्थेच्या संबंधित संहितेनुसार उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग बदलण्याची अथवा त्यामध्ये फेरबदल करण्याची आवश्यकता असणारी नोटीस बजावतील. अशा नोटीसमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्रुटींचे किंवा आवश्यकतांचे अनुपालन केल्यानंतर, किंवा निरीक्षणादरम्यान कोणत्याही त्रुटी आढळून न आल्यास, विद्युत निरीक्षक त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तो अर्ज आपल्या अभिप्रायांसह आणि तपासणी नमुन्यासह (उद्वाहनांसाठी नमुना प किंवा सरकत्या जिन्यांसाठी किंवा सरकत्या मार्गांसाठी नमुना फ) संबंधित अधीक्षक

UNCOMPLYCATE simplifying compliance

अभियंत्यांकडे पाठवतील. अधीक्षक अभियंता, या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, अनुज्ञप्तीचे नूतनीकरण एकतर मंजूर करतील किंवा नाकारतील. जेव्हा नूतनीकरण मंजूर केले जाईल, तेव्हा नूतनीकरण केलेली अनुज्ञप्ती नमुना यख मध्ये निर्गमित करण्यात येईल.

८. अनुज्ञप्तीची दुय्यम प्रत देणे किंवा मालकी हक्काचे हस्तांतरण :-

(१) जेव्हा नियम ५ च्या तरतुदींन्वये निर्गमित केलेली अनुज्ञप्ती हरवली असेल किंवा नष्ट झाली असेल किंवा जेथे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालू आहे अशा जागेची मालकी हस्तांतरित झाली असेल, तेव्हा अनुज्ञप्तीधारक, अनुज्ञप्तीची दुय्यम प्रत मिळण्यासाठी किंवा यथास्थिती, अनुज्ञप्तीच्या मालकी हक्काचे हस्तांतरण करण्यासाठी विद्युत निरीक्षकाकडे अर्ज करील.

(२) असा प्रत्येक अर्ज, अनुज्ञप्तीच्या दुय्यम प्रतीसाठी नमुना यग मध्ये आणि मालकी हक्काच्या हस्तांतरणासाठी नमुना यघ मध्ये, शासनाने **शासकीय राजपत्रात** अधिसूचित केलेले शुल्क आणि पुढील कागदपत्रांसह करील :-

(क) नमुना ग मधील वास्तुविशारद प्रमाणपत्र ;

(ख) नमुना घ मधील **संरचनात्मक अभियंत्याचे प्रमाणपत्र**;

(ग) मालक आणि मान्यताप्राप्त कंत्राटदार यांनी यथोचित स्वाक्षरी केलेला तांत्रिक नकाशा (जर जुना अभिलेख उपलब्ध नसेल तर) ;

(घ) पोलीस अ-दखलपात्र नोंद अहवाल (जर जुनी अनुज्ञप्ती गहाळ झाली असेल तर) ;

(ङ) उद्वाहनासाठी नमुना त मधील आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना थ मधील चाचणी अहवाल ;

(च) कलम ७ च्या पोट-कलम (६) अन्वये मान्यताप्राप्त कंत्राटदाराचे प्रमाणपत्र ;

(छ) मागील वर्षाचे निरीक्षण शुल्क भरल्याची पावती ;

(ज) निरीक्षण अहवाल (उद्वाहनासाठी नमुना द आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना ध) ;

(झ) मूळ अनुज्ञप्तीची प्रत ;

(ञ) वार्षिक परिरक्षण कराराची प्रत ;

(ट) नमुना यड नुसार अनुज्ञप्तीधारकाचे प्रतिज्ञापत्र ;

(ठ) मालकी हक्कातील बदल दर्शविणारे कागदपत्र (मालकी हक्क हस्तांतरणाच्या अर्जाच्या बाबतीत).

(३) पोट-नियम (२) अन्वये अर्ज प्राप्त झाल्यावर, विद्युत निरीक्षक त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, तो अर्ज आपल्या अभिप्रायांसह संबंधित अधीक्षक अभियंत्यांकडे पाठवतील. संबंधित अधीक्षक अभियंता, या नियमांच्या तरतुदींच्या अधीन राहून, अर्ज एकतर मंजूर करतील किंवा नाकारतील. अर्ज मंजूर केल्यास, उद्वाहनासाठी नमुना भ मध्ये आणि सरकत्या जिन्यासाठी किंवा सरकत्या मार्गासाठी नमुना म मध्ये अनुज्ञप्ती निर्गमित करतील.

(५) या नियमान्वये निर्गमित केलेल्या अनुज्ञप्तीच्या दुय्यम प्रतीवर किंवा अनुज्ञप्तीच्या मालकी हक्क हस्तांतरण प्रतीवर मूळ अनुज्ञप्ती निर्गमित केल्याचा दिनांक स्पष्टपणे नमूद केला असेल आणि त्यावर "दुय्यम प्रत" किंवा यथास्थिती, "नावात बदल" असा शिक्का मारण्यात येईल.

९. कलम १२ अन्वये उद्वाहन, सरकता जिना, सरकता मार्ग यांचे विनिर्देश.-

(१) जोपर्यंत लागू असलेल्या संबंधित राष्ट्रीय इमारत संहितेचे किंवा भारतीय मानक संस्थेच्या संहितेचे, आणि विशेषतः परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग याकरिता एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे (यूडीसीपीआर) अनुपालन होत नाही, तोपर्यंत उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालविण्याची कोणतीही अनुज्ञप्ती दिली जाणार नाही.

(२) उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग आणि संबंधित संचमांडणी हे वीज अधिनियम, २००३ (२००३ चा ३६) आणि त्याअन्वये केलेले केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा आणि वीज पुरवठ्यासंबंधी उपाययोजना) विनियम, २०२३ चे अनुपालन करतील.

(३) जर उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यासंबंधीच्या कोणत्याही अटी किंवा तरतुदी यांमध्ये भारतीय मानक संस्थेची संहिता, भारतीय राष्ट्रीय इमारत

संहिता आणि एकत्रित विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) यांच्या तरतुदींन्वये समाविष्ट केलेल्या नसतील, परंतु आंतरराष्ट्रीय मानक संस्था (आय. एस. ओ.) किंवा युरोपियन मानक (ई. एन.) मधील तरतुदींचा समावेश असेल, तर उक्त अटी आणि तरतुदी या महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेनंतर स्वीकारल्या जाऊ शकतील आणि त्यानंतर अनुज्ञप्ती देताना त्यांचे पालन केले जाईल.

(३) उद्वाहन संचमांडणीच्या उद्वाहन गाडीमध्ये बंदिस्त परिपथ दूरचित्रवाणी (सी. सी. टी. व्ही.) यंत्रणा बसवलेली असेल:

परंतु, या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, ज्या विद्यमान उद्वाहनांमध्ये बंदिस्त परिपथ दूरचित्रवाणी (सी. सी. टी. व्ही.), स्वयंचलित बचाव साधन (ए. आर. डी.), अतिभार संरक्षक साधन (ओ. एल. पी. डी.) बसविलेले नाहीत, अशा विद्यमान उद्वाहनांमध्ये बंदिस्त परिपथ दूरचित्रवाणी (सी. सी. टी. व्ही.), स्वयंचलित बचाव साधन (ए.आर.डी.), अतिभार संरक्षक साधन (ओ. एल. पी. डी.) हे या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून म्हणजेच हे नियम **शासकीय राजपत्रात** अधिसूचित झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत बसविणे आवश्यक असेल.

१०. उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग पुढील अटींवर चालवले जातील. - प्रत्येक उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग साधनसामग्री आणि संचमांडणी पुढील अटींच्या अधीन राहून चालविली जाईल:-

(१) अनुज्ञप्तीधारक प्रत्येक उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग आणि त्याची संचमांडणी नियम ९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आवश्यकतांनुसार परिरक्षित करतील.

(२) अनुज्ञप्तीधारक स्वत: किंवा त्याच्या प्राधिकृत कंत्राटदारामार्फत उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग, यथास्थिती, उद्वाहनासाठी नमुना द मध्ये आणि सरकता जिना आणि सरकता मार्गासाठी नमुना ध मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वेळापत्रकानुसार नियतकालिक लेखापरीक्षण आणि चाचणी करतील, आणि वर्षातून किमान एकदा किंवा विद्युत निरीक्षकांनी मागणी केल्यानुसार अशा आधीच्या ठराविक कालांतराने प्रमाणित करतील. सदर अहवाल विद्युत निरीक्षकाकडे सादर केला जाईल.

UNCOMPLYCATE simplifying compliance

	(३) अनुज्ञप्तीधारक कोणत्याही जागेवरील उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग किंवा संबंधित संचमांडणीमध्ये असे कोणतेही वाढीव काम किंवा फेरफार करणार नाही ज्यामुळे त्याच्या मूळ तांत्रिक वैशिष्ट्यांमध्ये बदल होईल किंवा ज्याचा साधनसामग्रीच्या सुरक्षित कामकाजावर किंवा वापरकर्ता, परिरक्षण करणाऱ्या व्यक्ती किंवा संचमांडणीच्या परिसरातील व्यक्तींच्या सुरक्षिततेवर परिणाम होऊ शकेल, आणि नियम ९ तसेच कलम १० च्या तरतुदींनुसार आवश्यक असल्याप्रमाणे अधीक्षक अभियंत्यांकडून त्यासंबंधीची परवानगी मिळवल्याशिवाय कोणत्याही ठिकाणी उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग उभारणार नाही किंवा बसवणार नाही. (४) अनुज्ञप्तीधारक साधनसामग्रीच्या आणि संबंधित संचमांडणीच्या परिरक्षणाची जबाबदारी एका मान्यताप्राप्त कंत्राटदारावर सोपवेल. अशा नियुक्तीवर, मान्यताप्राप्त कंत्राटदार या नियमांन्वये अनुज्ञप्तीधारकावर लादलेली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, त्याला नेमून दिलेल्या मर्यादेपर्यंत, पार पाडण्यासाठी जबाबदार असेल आणि अनुज्ञप्तीधारक अशा कंत्राटदारास अशी कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्यापासून अडवणार नाही किंवा प्रतिबंध करणार नाही. (५) अनुज्ञप्तीधारक उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यातील प्रत्येक दुरुस्ती आणि फेरफाराची नोंद एका रोजवही नमुन्यामध्ये (उद्वाहनांसाठी नमुना यच मध्ये आणि सरकते जिने आणि सरकत्या मार्गांसाठी नमुना यछ मध्ये) करतील, जी प्रत्येक उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग संचमांडणीमध्ये जतन केली जाईल. (६) अनुज्ञप्तीधारक साधनसामग्री किंवा संचमांडणीमधील प्रत्येक बिघाडावर, ज्याबाबत मान्यताप्राप्त कंत्राटदाराने अहवाल दिला असेल, त्यावर त्वरित उपाययोजना करतील. (७) अनुज्ञप्तीधारक हे सुनिश्चित करतील की, उद्वाहने, सरकते जिने आणि सरकते मार्ग यांचे परिरक्षण आणि तपासणी दर महिन्याला किमान एकदा मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून केली जाते. अशा परिरक्षण आणि तपासणीचे निष्कर्ष

	कंत्राटदाराकडून उद्वाहनांच्या रोजवहीत नमुना यच मध्ये आणि सरकते जिने आणि सरकत्या मार्गांसाठी नमुना यछ मध्ये नोंदवले जातील. (८) अनुज्ञप्तीधारक उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग चालविण्याबाबतची अनुज्ञप्ती तळमजल्यावर किंवा प्रवेश पातळीवर किंवा विद्युत निरीक्षकाने विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे प्रदर्शित करेल. (९) अनुज्ञप्तीधारक विद्युत निरीक्षकाने विनिर्दिष्ट केल्यानुसार, सुरक्षेसंबंधी सूचनांचे फलक आणि चिन्हे, उद्वाहनासाठी नमुना यज आणि यझ मध्ये आणि सरकता जिना किंवा सरकता मार्गासाठी नमुना यञ मध्ये पुरवल्याप्रमाणे प्रदर्शित करेल. (१०) कोणतीही व्यक्ती उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग संचमांडणीच्या कोणत्याही यंत्रणेत जाणीवपूर्वक हस्तक्षेप करणार नाही. (११) फेरफार किंवा दुरुस्तीसाठी प्रणालीपासून सहा महिने किंवा त्याहून अधिक कालावधीसाठी खंडित ठेवलेले कोणतेही उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग, जोपर्यंत अशा उपकरणांवर, केबलवर किंवा पुरवठा लाईनवर मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून संबंधित मानकांनुसार प्रत्यक्ष जागी चाचण्या घेतल्या जात नाहीत तोपर्यंत वापरात आणले जाणार नाही. (१२) अठरा वर्षांखालील कोणत्याही व्यक्तीस उद्वाहन चालक म्हणून नियुक्त केले जाणार नाही. उद्वाहन चालक अशी व्यक्ती असेल जी मानसिक आणि शारीरिकदृष्ट्या सुदृढ असेल आणि तिला उद्वाहनाच्या योग्य कार्यचलनाचे प्रशिक्षण दिलेले असेल. (१३) बारा वर्षांखालील मुलांना, एखादी प्रौढ व्यक्ती सोबत असल्याखेरीज, उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही. (१४) या नियमांन्वये दिलेली प्रत्येक अनुज्ञप्ती, जर ती या नियमात नमूद केलेल्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करत असेल, तर ती रद्द झाली आहे असे मानण्यात येईल. (१५) जर उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचा कोणताही भाग, परिवेष्टन, दरवाजा किंवा नट बोल्ट खराब झाला असेल किंवा तुटला असेल, तर अनुज्ञप्तीधारक त्वरित त्याची दुरुस्ती करेल आणि तो चांगल्या कार्यक्षम स्थितीत

	आणेल. अनुज्ञप्तीधारक सुरक्षितता साधने सुस्थितीत ठेवतील. उद्वाहन किंवा सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांचे सर्व भाग आणि सुरक्षितता साधने स्वच्छ आणि कचरा, धूळ किंवा घाणीपासून मुक्त ठेवतील. अनुज्ञप्तीधारकाने ताण, पीळ किंवा वाकण्याच्या बलास अधीन असलेल्या कोणत्याही तुटलेल्या किंवा खराब झालेल्या भागाचे अथवा प्रवाशांची वाहतूक करणारे भाग ज्या भागांवर आधारलेले असतात, अशा कोणत्याही भागाचे सांधकाम करू नये. ११. अपघाताची सूचना आणि अहवाल व कलम १५ अन्वये ज्या कालावधीत अपघाताची सूचना आणि अहवाल द्यावयाचा आहे तो कालावधी- (१) प्रत्येक अपघाताची सूचना कलम १५ मध्ये निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार नमुना यट मध्ये आणि अपघाताच्या सविस्तर अहवालासह नमुना यठ मध्ये चोवीस तासांच्या कालावधीत विद्युत निरीक्षक आणि स्थानिक पोलीस ठाण्याला दिली जाईल. (२) विद्युत निरीक्षक अधिनियमाच्या कलम १५ चे पोट-कलम (४) नुसार चौकशी करतील आणि अहवाल देतील. १२. उद्वाहने किंवा सरकता जिना किंवा सरकते मार्ग यांचे नियतकालिक निरीक्षण- (१) जेथे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग वापरात असेल, तेथे अशा प्रत्येक उद्वाहनाचे किंवा सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे अधिनियमाच्या कलम १७ च्या तरतुदींनुसार विद्युत निरीक्षकाकडून नियतकालिक निरीक्षण आणि चाचणी केली जाईल. (२) असे निरीक्षण करण्यापूर्वी, जागेच्या मालकाला नमुना यड मध्ये नोटीस बजावली जाईल, आणि जर कोणत्याही दुरुस्त्या किंवा फेरफार आवश्यक असतील तर, उद्वाहन, सरकता जिना किंवा यथास्थिति, सरकता मार्ग यांचा वापर थांबविण्याचा देण्यात येणारा निर्देश नमुना यढ मध्ये बजावला जाईल. १३. उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग यांच्या वापरास प्रतिबंध आणि सील करणे.- (१) वापर न करण्याबाबतची सूचना.- मालक किंवा अनुज्ञप्तीधारक अधीक्षक अभियंत्याला अशा कोणत्याही उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्गाबद्दल

UNCOMPLYCATE Simplifying compliance

	माहिती देईल जे वापरास प्रतिबंध करावयाचे आहे, वापरातून कायमस्वरूपी काढून टाकावयाचे आहे, किंवा सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी वापरातून बंद करावयाचे आहे. (२) असुरक्षित स्थितीत असल्यास उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग सील करणे.- अधीक्षक अभियंता, कलम २१ अन्वये त्याला सादर केलेल्या अहवालानुसार, उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग यामध्ये करावयाच्या दुरुस्त्या आणि फेरफारांसाठी नमुना यण मध्ये निर्देश देतील. जर अधीक्षक अभियंत्याने दिलेल्या निर्देशांचे पालन केले नाही किंवा अनुपालन झाले नाही, तर अधीक्षक अभियंता अधिनियमाच्या तरतुदींनुसार असे उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग सील करू शकतील. (३) न वापरलेली उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग.- जेथे कोणत्याही जागी बसविलेले उद्वाहन, सरकता जिना किंवा सरकता मार्ग म्हणून वापरणे बंद झाले असेल, तेथे मालक एकतर ते काढून टाकतील किंवा विद्युत पुरवठ्यापासून पूर्णपणे खंडित केल्यानंतर ते सुरक्षित यांत्रिक स्थितीत परिरक्षित करतील. सर्व दरवाजे आणि दरवाजांचे उघडणे आणि प्रवेश मार्ग सुरक्षितपणे कुलूपबंद केले जातील किंवा अडवण लावले जातील जेणेकरून उद्वाहन-कूप, सरकते जिने किंवा सरकत्या मार्गांवर अनधिकृत व्यक्तींचा प्रवेश रोखता येईल. वापरात नसलेले सरकते जिने किंवा सरकते मार्ग, जिने किंवा चालण्याचे मार्ग म्हणून वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही.

UNCOMPLYCAT Simplifying compliance

जोडपत्र

उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग यांच्या संचमांडणीसाठी लागू मानके

उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग यांच्या संरचनेचे, निर्मितीचे, संचमांडणीचे, चाचणीचे, निरीक्षणाचे, संचालनाचे, परिरक्षणाचे आणि सुरक्षेचे कामकाज हे भारतीय मानके संहिता आणि यथास्थिती, इतर सांविधिक आवश्यकतांच्या पुढील सुधारित आवृत्त्या व दुरुस्त्यांनुसार, असणे आवश्यक आहे:

अ.क्र.	आय.एस. क्र. / मानक	शीर्षक
१	आय.एस. १७९०० (भाग १): २०२२	व्यक्ती व वस्तू यांच्या वाहतुकीसाठी उद्वाहने - भाग १: सुरक्षा नियम
२	आय.एस. १७९०० (भाग २): २०२२	व्यक्ती व वस्तू यांच्या वाहतुकीसाठी उद्वाहने - भाग २: डिझाइन नियम, परिगणना, निरीक्षणे व उद्वाहकाच्या भागांच्या चाचण्या
३	आय.एस. १७९०० (भाग ३/विभाग १): २०२३	व्यक्ती व वस्तू यांच्या वाहतुकीसाठी उद्वाहने - भाग ३: नियोजन व निवड यांसाठी विनिर्देश - विभाग १: प्रवासी/ सेवा/ रुग्णालय खाट / रुग्णपट उद्वाहने
४	आय.एस. १७९०० (भाग ६): २०२२	व्यक्ती व वस्तू यांच्या वाहतुकीसाठी उद्वाहने - भाग ६: उद्वाहनांच्या परिरक्षणासाठी मार्गदर्शक
५	आय.एस. ४५९१ (भाग १/विभाग १): २०२०	सरकते जिने व सरकते मार्ग - भाग १: आवश्यक सुरक्षितता
६	आय.एस. ४५९१ (भाग १/विभाग २): २०२०	सरकते जिने व सरकते मार्ग - भाग १: नियोजन व निवड यांसाठी मार्गदर्शक
७	आय.एस. ४५९१ (भाग १/विभाग ३): २०२०	सरकते जिने व सरकते मार्ग चाचणी - भाग १: निरीक्षण व चाचणी
८	आय.एस. ४५९१ (भाग २): २०२०	सरकते जिने व सरकते मार्ग - भाग २: परिरक्षणासाठी मार्गदर्शक
९	आय.एस. २३६५: २०२४	उद्वाहनांसाठी पोलादी तारांचे रज्जू - किमान आवश्यकता
१०	आय.एस. ४२८९ (भाग १): १९८४	उद्वाहने व इतर लवचिक जोडण्यांसाठी लवचिक केबल्सचे विनिर्देश - भाग १: प्रत्यास्थबहुवारिक

		(एलास्टोमर) निरोधित केबल्स
११	आय.एस. ४२८९ (भाग २): २०००	उद्वाहने व इतर लवचिक जोडण्यांसाठी लवचिक केबल्स - भाग २: पीव्हीसी निरोधित वर्तुळाकार केबल्स
१२	आय.एस. ८२१६: १९७६	उद्वाहन तारेच्या रज्जूंच्या निरीक्षणासाठी मार्गदर्शक
१३	आय.एस. १४६७१: १९९९	द्रविकचालन (हायड्रॉलिक) उद्वाहनाची संचमांडणी व परिरक्षणाची कार्यसंहिता
१४	आय.एस. १५२५९: २००२	घरगुती/गृह उद्वाहनांची संचमांडणी व परिरक्षण - कार्यसंहिता
१५	आय.एस. १५३३०: २०२०	दिव्यांग व्यक्तींसाठी उद्वाहनांच्या आवश्यकता
१६	आय.एस. १५७८५: २००७	संकेतमान्य यंत्र कक्ष नसलेल्या उद्वाहनाची उभारणी व परिरक्षण - कार्यसंहिता
१७	आय.एस. १५३३०: २०२०	दिव्यांग व्यक्तींसाठी उद्वाहनांची आवश्यकता - पहिले पुनरीक्षण
१८	आय.एस. १७३८६: २०२०	विद्युत संकर्षण उद्वाहने (इलेक्ट्रिक ट्रॅक्शन लिफ्ट्स) - विद्यमान इमारतींमधील विद्यमान प्रवासी व वस्तू वाहतूक उद्वाहने बदलणे
१९	आय.एस. १७४९१: २०२०	विद्यमान उद्वाहनांसाठी सुरक्षा मानके - जोखीम मूल्यमापन व जोखीम कमी करणे
२०	आय.एस. १७८०६: २०२२	प्रवासी उद्वाहने व सेवा उद्वाहने - उद्वाहन गाडी व प्रतिभारासाठी मार्गदर्शक रूळमार्ग - टी-प्रकार (T-Type)
२१	एस.पी. ७: २०२६	राष्ट्रीय इमारत बांधकाम मानके, २०२६
२२	भारताची राष्ट्रीय विद्युत संहिता	विद्युत संचमांडणी व सुरेक्षेसंबंधीच्या लागू तरतुदी
२३	विद्युत अधिनियम, २००३	विद्युत सुरक्षा व पुरवठ्यासंबंधीच्या लागू तरतुदी
२४	केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत पुरवठ्याशी संबंधित उपाय) नियम, २०२३	केंद्रीय विद्युत प्राधिकरण (सुरक्षा व विद्युत **पुरवठ्याशी संबंधित उपाय) नियम**, २०२३, वेळोवेळी दुरूस्त केल्याप्रमाणे

२५	लागू भारतीय मानके	विशिष्ट प्रकार, संरचना, घटक, उपकरण, संचमांडणी, चाचणी, निरीक्षण, संचालन किंवा उद्वाहन, सरकते जिने किंवा सरकते मार्ग यांच्या परिरक्षणासाठी लागू असलेले इतर कोणतेही संबंधित भारतीय मानक

टीप: या जोडपत्रात निर्दिष्ट केलेल्या मानकामध्ये भारतीय मानक संस्थेद्वारे जेव्हा जेव्हा सुधारणा, दुरुस्ती, अधिग्रहित किंवा बदल केला जाईल, तेव्हा शासनाद्वारे अन्यथा विनिर्दिष्ट केल्याशिवाय, तिची नवीनतम आवृत्ती, पुनरीक्षण व दुरुस्त्या लागू होतील.

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना क

(नियम ५ (१) पहा)

उद्वाहन उभारणीच्या परवानगीसाठी अर्ज

प्रति,

विद्युत निरीक्षक

.....

विषय:- उद्वाहनाची उभारणी किंवा वाढीव काम किंवा फेरफार करण्याच्या परवानगीसाठी अर्ज.

१. मालकाचे पूर्ण नाव व पत्ता _____

२. ज्या जागेमध्ये/इमारतीमध्ये उद्वाहनाची संचमांडणी करावयाची आहे / भर घालण्यासाठी अथवा फेरफार करण्यासाठी त्या जागेचा पत्ता

_____

३. यापूर्वी अनुज्ञप्ती मान्य करण्यात आली आहे का? (भार किंवा फेरफार असल्यास) (तपशील देणे आवश्यक),

४. काम करणाऱ्या मान्यता दिलेल्या उद्वाहन,सरकते जिने व सरकते मार्ग कंत्राटदाराचे नाव आणि पत्ता,

५. उभारणीसाठी प्रस्तावित असलेल्या उद्वाहनाचा प्रकार व ती कोणत्या कंपनीची आहे,

६. उद्वाहनाचा आराखडा व उभारणीचे नकाशे जोडण्यात यावेत,

७. उद्वाहन गाडीचा निर्धारित कमाल वेग (मीटर/सेकंद) _____

८. उद्वाहन गाडीची निर्धारित क्षमता (किलोग्रॅम व व्यक्तींच्या संख्येत) _____

९. प्रवासी, उद्वाहन गाडी व रज्जू आणि प्रतिपूरक साखळी यांसह उद्वाहन गाडीचा एकूण स्थिर भार _____

१०. प्रतिभाराचे वजन (किलोग्रॅममध्ये) _____

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

११. सहाय्यभूत केबल्स / पट्टे / रज्जू यांची संख्या, वर्णन, वजन व आकारमान _____

१२. तळापासूनचे अंतर (बॉटम क्लिअरन्स) (मिलीमीटरमध्ये) _____

१३. वरील अंतर (टॉप क्लिअरन्स) (मिलीमीटरमध्ये) _____

१४. मोटरची क्षमता _____

१५. थांब्यांची व द्वारांची (ओपनिंग्स) संख्या _____

१६. उद्वाहन खड्ड्याची खोली (मिमी मध्ये) _____

ठिकाण-

दिनांक -

(अर्जदाराची स्वाक्षरी)

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना ख

(नियम ५ (१) पहा)

सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांच्या उभारणीच्या किंवा संचमांडणीच्या परवानगीसाठी अर्ज

प्रति,

विद्युत निरीक्षक

.....

विषय:- सरकता जिना किंवा सरकता मार्ग यांची उभारणी, वाढीव काम किंवा फेरफार करण्याच्या परवानगीसाठी अर्ज.

१. मालकाचे पूर्ण नाव व पत्ता _____

२. ज्या जागेमध्ये सरकता जिना किंवा सरकता मार्ग बसवायचा आहे किंवा वाढीव काम अथवा फेरफार करावयाचा आहे त्या जागेचा पत्ता _____

३. यापूर्वी अनुज्ञप्ती मान्य करण्यात आली आहे का? (वाढीव काम किंवा फेरफार असल्यास) (तपशील देणे आवश्यक) _____

४. काम करणाऱ्या मान्यता दिलेल्या उद्वाहन , सरकते जिने व सरकते मार्ग कंत्राटदाराचे नाव व पत्ता, _____

५. उभारणीसाठी प्रस्तावित असलेल्या सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा प्रकार व ती कोणत्या कंपनीची आहे, _____

६. सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा आराखडा व उभारणीचे नकाशे जोडण्यात यावेत,-

७. सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा निर्धारित वेग (मीटर/सेकंद) _____

८. सरकत्या जिन्याची किंवा सरकत्या मार्गाची दर ताशी प्रवासी वाहून नेण्याची निर्धारित वहन क्षमता _____

९. सरकत्या जिन्याचा किंवा सरकत्या मार्गाचा रोधक भार _____

१०. सरकत्या जिन्याचा/ सरकत्या मार्गाचा प्रतल कोन _____

११. सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या स्तंभिका कठड्याचा प्रकार _____

१२. सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या स्तंभिका कठड्यांमधील पायऱ्यांची रुंदी-

१३. सरकत्या जिन्याचे किंवा सरकत्या मार्गाचे एकूण मार्गक्रम, उंची आणि जिन्याची सपाटी यांचा तपशील _____

१४. सपाट पायऱ्यांची संख्या_____

१५. स्थिर भारावर आधारित चालन घटकांसाठी सुरक्षांक _____

ठिकाण

दिनांक

(अर्जदाराची स्वाक्षरी)

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना ग

(नियम ५(२), ७ (६) व ८(२) पहा)

वास्तुविशारदाचे प्रमाणपत्र

संदर्भ: दिनांक:

प्रमाणपत्र
ज्याच्याशी संबंधित असेल त्या सर्वांसाठी

_____नावाची इमारत, जिचा जागेचा पत्ता_____ असा आहे, ती बांधून पूर्ण झालेली आहे / तिचे बांधकाम सुरू आहे. सदर इमारतीचे स्थापत्य बांधकाम नकाशे एकत्रित विकास नियंत्रण आणि संवर्धन नियमावली (यूडीसीपीआर) आणि अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय इमारत बांधकाम मानकांनुसार मंजूर करण्यात आले आहेत.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, एकूण _____ मजल्यांच्या मंजूर इमारत नकाशानुसार / प्रत्यक्ष जागेवरील परिस्थितीनुसार, सभोवतालच्या जमिनीच्या स्तरापासून ते सर्वात वरच्या मजल्याच्या (____मजले) गच्चीचा मजल्याच्या स्तरापर्यंत इमारतीची एकूण उंची _____ मीटर आहे.

उद्वाहन दंड (खड्डा आणि उपरिभाग) / सरकत्या जिन्याचे खड्डे / सरकत्या मार्गाचे खड्डे व उद्वाहन यंत्र कक्षाचा तपशील मंजूर स्थापत्य बांधकाम नकाशांमध्ये दर्शविला गेला आहे आणि तो उद्वाहने, सरकते जिने, सरकते मार्ग यांसाठीच्या भारतीय मानकांनुसार विहित केलेल्या मानकांशी सुसंगत आहे.

महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६ मध्ये नमूद केलेल्या वैधानिक आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक _____

वास्तुविशारदाची स्वाक्षरी
नाव व पदनामासह

नोंदणी क्रमांक शिक्क्यासह

प्रत सादर,
विद्युत निरीक्षक
.....

टीप- लागू नसेल ते खोडावे.

नमुना घ

(नियम ५ (२), ७ (६) व ८ (२) पहा)

संरचनात्मक अभियंत्याचे प्रमाणपत्र

संदर्भ: _____ दिनांक:

_____

प्रमाणपत्र
ज्याच्याशी संबंधित असेल त्या सर्वांसाठी

_____ नावाची इमारत, जिचा जागेचा पत्ता _____ असा आहे, ती बांधून पूर्ण झालेली आहे / तिचे बांधकाम सुरू आहे. सदर इमारतीचे स्थापत्य बांधकाम नकाशे एकत्रित विकास नियंत्रण आणि संवर्धन नियमावली (यूडीसीपीआर) आणि अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय इमारत बांधकाम मानकांनुसार मंजूर करण्यात आले आहेत.

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, वरील इमारतीसाठी उद्वाहनाची रचना व परिवेष्टन / यंत्र कक्ष / सरकत्या जिन्याची / सरकत्या मार्गाची आधारभूत रचना आणि परिवेष्टन याची संकल्पना उद्वाहन / सरकता जिना / सरकता मार्ग उत्पादकाच्या आवश्यकता व विनिर्देशांनुसार, संबंधित भारतीय मानके (आय. एस.) आणि राष्ट्रीय इमारत संहितेचे पालन करून माझ्याद्वारे तयार करण्यात आले आहे. तसेच ही रचना यंत्रांचा येणारा स्थिर व गतिमान भार पेलण्यासाठी संरचनात्मकदृष्ट्या मजबूत आहे.

महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६ मध्ये नमूद केलेल्या वैधानिक आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी हे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

दिनांक _____

संरचनात्मक अभियंत्याची स्वाक्षरी
नाव व पदनामासह

नोंदणी क्रमांक शिक्क्यासह

प्रत सादर,
विद्युत निरीक्षक
.....
.....

टीप- लागू नसेल ते खोडावे.

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना ड

(नियम ५ (२) पहा)

उद्वाहन, सरकता जिना व सरकते मार्ग उभारण्यासाठी मान्यताप्राप्त कंत्राटदाराचे घोषणापत्र

आम्ही याद्वारे घोषित करतो की, या घोषणापत्राच्या दिनांकापासून सहा महिन्यांपूर्वीच्या कालावधीत महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (२०१८ चा १५) अन्वये ज्या उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग यांच्या **उभारण्यासाठी** परवानगी मंजूर करण्यात आली होती, त्या सर्व कामांची कंत्राटे आम्ही स्वीकारून पूर्ण केली आहेत. आम्ही याद्वारे असेही घोषित करतो की, पूर्ण झालेल्या उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग यांच्या सर्व संचमांडणींची विद्युत निरीक्षकांद्वारे योग्य ती तपासणी करण्यात आली असून त्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या दोषांची रीतसर पूर्तता करण्यात आली आहे. आमच्याद्वारे उभारण्यात आलेले सर्व उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग संबंधित मालकांकडे सोपवण्यात आले आहेत. सद्यस्थितीत आमच्याकडे संचमांडणींच्या टप्प्यावर ..... उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग आहेत. तसेच आम्ही असेही घोषित करतो की, उद्वाहन / सरकता जिना / सरकता मार्ग यांच्या उभारणीमध्ये वापरलेले सर्व घटक हे संबंधित भारतीय मानकांनुसार संरचित केलेले आणि चाचणी केलेले असतील.

.....

(मान्यताप्राप्त कंत्राटदाराची स्वाक्षरी)

UNCOMPLY Simplifying Compliance

नमुना च

(नियम ५ (४) पहा)

उद्वाहन उभारणीसाठीचा छाननी नमुना

उद्वाहन मालकाचे नाव आणि पत्ता : _____
(मराठीमध्ये) : _____
उद्वाहन बसवण्याच्या जागेचा पत्ता : _____
(मराठीमध्ये) : _____
उद्वाहन कंत्राटदाराचे नाव : _____

सर्वसाधारण

१. उद्देश : नवीन / पुनर्स्थापना / उद्वाहन संचमांडणीचे नूतनीकरण
२. उद्वाहनाचा प्रकार : प्रवासी / माल / स्वयंचलित्र / घरगुती / रुग्णालयीन
३. चालनाचा (ड्रायव्हचा) प्रकार : गिअर चालित मोटर / गिअरविरहित मोटर / द्रविकचालन आवेष्टन (हायड्रॉलिक पॅक)
४. उद्वाहन यंत्राचे स्थान : यंत्र कक्षासह (एमआर) प्रकार / यंत्र कक्षाविरहित (एमआरएल) प्रकार
५. गाडीची वाहून नेण्याची निर्धारित वहन क्षमता : ..... किलोग्रॅम. ..... व्यक्ती
६. उद्वाहनाचा वेग : ..... मीटर प्रति सेकंद (मी/से) एकेरी वेग (एस/एस), / दुहेरी वेग (डी/एस), / चल वेग (व्ही/एस)
७. थांब्यांसह मजल्यांची संख्या आणि जिन्याची सपाटी : जी+..... थांबे - ..... जिन्याची सपाटी - .....
८. नियंत्रणाचा प्रकार : सामान्य / खालच्या दिशेने एकत्रित / संपूर्ण एकत्रित
९. गच्चीच्या मजल्याच्या स्तरापर्यंत इमारतीची उंची : ..... मीटर
१०. इमारतीची उंची २४ मीटरपेक्षा जास्त असल्यास : अग्निरोध / अग्निरोध विरहीत उद्वाहन परवानगी क्रमांक .....

उद्वाहनाचा खड्डा

१. उद्वाहनाच्या खड्ड्याचा आकार : ..... मिमी (रुंदी) X ..... मिमी (खोली) X ..... मिमी (उंची)
२. खड्ड्याची खोली १५०० मिमी पेक्षा जास्त असल्यास उद्वाहन खड्ड्यात शिडी पुरवली आहे का : लागू नाही (एन.ए) / पुरवली आहे
३. बफरचा प्रकार : स्प्रिंग / रबर / तैल-द्रविकचालन (ऑईल-हायड्रॉलिक)
४. खड्ड्याच्या मजल्यासाठी बफरची उंची आणि प्रमाण : (क) गाडी - नग ..... X ..... मिमी (ख) प्रतिभार - नग ..... X ..... मिमी
५. तळाकडील धाव (बॉटम रन बाय) : (क) गाडी..... मिमी (ख) प्रतिभार..... मिमी

६. उद्वाहनाच्या खड्ड्याखाली तळघर (बेसमेंट) आहे का : होय / नाही

UNOFFICIAL Simplifying Compliance

होय असल्यास, प्रतिभारसाठी ओएसजी पुरवला आहे का : होय / नाही

गाडी (कार)

१. गाडीचे (कार) आवेष्टन (एनक्लोजर) : एम.एस. / एस.एस. / लाकडी + काच
२. गाडीच्या दरवाज्याचा प्रकार : मॅन्युअल / ऑटो, एम.एस / एस.एस, घडीचा/ स्विंग / टेलिस्कोपिक / सीओपीओडी)
३. मजल्यावरील दरवाज्याचा प्रकार : मॅन्युअल / ऑटो, एम.एस / एस.एस, घडीचा / स्विंग / टेलिस्कोपिक / सीओपीओडी)
४. मजल्यावरील दरवाज्याची प्रत्यक्ष मापे : ..... मिमी (रुंदी) X ..... मिमी (उंची)
५. गाडीचा आतील प्रत्यक्ष मापे : ..... मिमी (रुंदी) X ..... मिमी (खोली) X ..... मिमी (उंची)
६. गाडीचे आतील प्रत्यक्ष क्षेत्रफळ : ..... चौ. मीटर.
७. अतिभार साधन (ओव्हर लोड डिव्हाइस) : होय / नाही
८. एआरडी / डीजी / युपीएस : होय / नाही

उद्वाहन दंड (शाफ्ट) / गाडीच्या वरचा भाग (कार टॉप)

१. गाडीच्या वरच्या भागातील मोकळे अंतर (कार टॉप क्लिअरन्स) : ..... मिमी
२. गाडी व दंडाच्या (शाफ्ट) भिंतीमधील अंतर : डावीकडे ..... मिमी, उजवीकडे ..... मिमी
३. उद्वाहन दंडाच्या (शाफ्ट) आवेष्टनाचा प्रकार : आर.सी.सी. / विटांचे बांधकाम
४. गाडीसाठी 'टी' गाईड्सचा आकार : ..... मिमी X ..... मिमी X ..... मिमी
५. प्रतिभारासाठी 'टी' गाईड्सचा आकार : ..... मिमी X ..... मिमी X ..... मिमी

यंत्र कक्ष

चालन (ड्रायव्हिंग) उपकरणाचे स्थान : **एमआर / एमआरएल (MR / MRL)**
१. यंत्र कक्षाचा आकार : ..... मिमी (रुंदी) X ..... मिमी (खोली) X ..... मिमी (उंची)
२. यंत्र कक्षाच्या दरवाज्याचे प्रवेशद्वार : ..... मिमी (रुंदी) X ..... मिमी (उंची)
३. हवा खेळती राहण्याची / वायुव्हिजनाची व्यवस्था (व्हेंटिलेशन) : होय / नाही
४. प्लॅटफॉर्मच्या वर यंत्र कक्षाची उंची : ..... मिमी (उंची)
५. लिमिट स्विचेस : होय / नाही
६. मुख्य आणि लाईट स्विचची जागा देण्यात आली आहे का ? : होय / नाही
७. गव्हर्नर देण्यात आला आहे का ? : होय / नाही
८. यंत्राच्या सभोवतालची मोकळी जागा देण्यात आली आहे का ? : होय / नाही
९. खिडक्या देण्यात आल्या आहेत का ? : होय / नाही

१०. नियंत्रकाभोवतीची (कंट्रोलर) मोकळी जागा देण्यात आली आहे का ?: होय / नाही

UNCOMPLYCATE simplifying compliance

११. संविदेचा प्रज्योत (आर्क ऑफ कॉन्ट्रॅक्ट) : ..... अंश
१२. मुख्य रज्जुंचा तांत्रिक तपशील : ..... नग. ..... मिमी व्यास प्रति रज्जू
१३. बांधणी: .....
१४. मुख्य पट्ट्याचा तांत्रिक तपशील : ..... नग. ..... मिमी X ..... मिमी
१५. उद्वाहनाच्या सर्वात वरच्या सपाटीपासून उद्वाहन यंत्र कक्षासाठी स्वतंत्र प्रवेशद्वार : होय / नाही

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना छ

(नियम ५(४) पहा)

सरकते जिने किंवा सरकत्या मार्गाच्या उभारणीसाठी परवानगीचा छाननी नमुना.

सरकत्या जिन्याच्या किंवा सरकत्या मार्गाच्या मालकाचे नाव व पत्ता : _____

(मराठीमध्ये) : _____

सरकता जिना किंवा सरकते मार्ग जेथे बसविले आहेत तेथील पत्ता : _____

(मराठीमध्ये) : _____

सरकता जिना किंवा सरकत्या मार्गाच्या कंत्राटदाराचे नाव : _____

सर्वसाधारण

१. उद्देश : सरकता जिना किंवा सरकते मार्ग नवीन बसवायचा आहे / बदलायचा आहे / आधुनिकीकरण करायचे आहे.

२. कोणत्या प्रकारे चालतो : गिअर्ड मोटर / गिअरलेस मोटर / हायड्रॉलिक पॅक

३. जेथे बसविले आहे ते ठिकाण : _____

४. निर्धारित प्रवासी वहन क्षमता :_____ व्यक्ती/तास

५. सरकत्या जिन्याचा वेग :_____ मीटर प्रती सेकंद हँडरेलचा वेग : ____

६. मजल्याची उंची : _____

७. सरकत्या जिन्याचा/ सरकत्या मार्गाचा झुकण्याचा कोन : _____

८. पायरी: _____

एक) पायऱ्यांची संख्या _____

दोन) पायरीची उंची _____

तीन) पायरीची रुंदी _____

९. नियंत्रणाचा प्रकार : सामान्य नियंत्रण / अधोमुखी नियंत्रण (डाउन कलेक्टिव) / पूर्ण सामूहिक नियंत्रण (फुल कलेक्टिव)

१०. गच्ची पर्यंतची (टेरेस मजल्यापर्यंतची(इमारतीची उंची:..... मीटर मध्ये

सरकते जिने किंवा सरकत्या मार्गाचा खड्डा

१. सरकते जिने किंवा सरकत्या मार्गावरील खड्ड्याचा आकार :..... मि.मी. (रुंदी) — ..... मि.मी. (खोली) — ..... मि.मी. (उंची)

२. सरकते जिने किंवा सरकत्या मार्गावरील खड्ड्याचा आकार :..... मि.मी. (रुंदी) — ..... मि.मी. (खोली) — ..... मि.मी. (उंची)

३. सुरक्षा ब्रेकची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे का? : होय / नाही

४. हॅण्ड्रेलची सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे का? : होय / नाही

५. पायरी निरीक्षण (स्टेप मॉनिटर) सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे का? : होय / नाही

६. दंतपट्ट्याची (कॉम्ब प्लेट) सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे का? : होय / नाही

७. पायरी आणि बाजूचा फलक(स्कर्ट) यांच्यामधील अंतर : ..... मि.मी.

८. वरच्या व खालच्या बाजूस थांबविण्याच्या बटनाची (स्टॉप स्विचची) व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे का? : होय / नाही

UNCOMPLYCATE Simplifying Compliance

नमुना ज

(नियम ५(४) पहा)

उद्वाहन उभारण्याची परवानगी

महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता

ऊर्जा विभाग.

नोंदणी क्रमांक : _____ दिनांक : _____

प्रति,

_____

विषय: _____ येथील उद्वाहन उभारणीच्या परवानगीबाबत.

महोदय/महोदया,

याद्वारे आपणास कळविण्यात येते की, विद्युत निरीक्षक,..... यांच्याकडे सादर केलेल्या आपल्या अर्जानुसार, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (महा. २०१८ चा १५) च्या कलम ४ च्या पोट-कलम (३) अन्वये _____ येथे उद्वाहने उभारण्यास पुढील शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे,

१. परवानगीची वैधता_____ पासून _____ पर्यंत राहील

२. जर उद्वाहन उभारणीचे काम - _____पर्यंत पूर्ण झाले नाही, तर वरील परवानगीची मुदत वाढवून घेणे बंधनकारक राहील

३. जर उद्वाहन उभारणीचे काम - _____ च्या आधी सुरू करण्यात आले, तर कायदेशीर कारवाई करणे आवश्यक ठरेल.

४. ही परवानगी - _____ मजल्यांच्या (स्टॉप) उद्वाहनासाठी वैध असून, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६ च्या तरतुदींनुसार उद्वाहनाची उभारणी पूर्ण केली पाहिजे. उद्वाहन उत्पादक आणि उद्वाहन कंत्राटदाराने उक्त अधिनियम आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसारच काम केले पाहिजे. कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाल्यास उक्त अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये त्याच्यावर कारवाई केली जाईल.

आपला नम्र,

अधीक्षक अभियंता.

नमुना झ

(नियम ५(४) पहा)

सरकते जिने / सरकत्या मार्गाच्या उभारणीसाठी परवानगी

महाराष्ट्र शासन

अधीक्षक अभियंता

ऊर्जा विभाग.

नोंदणी क्रमांक_____ दिनांक: _____

प्रति,

_____

विषय : _____येथे सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारणीस परवानगी देण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग अधिनियम, २०१७ (२०१८ चा महा. १५) च्या कलम ४ च्या पोट-कलम (३) नुसार _____ येथे सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारण्यासाठी विद्युत निरीक्षक ------- यांच्याकडे आपण केलेल्या अर्जास पुढील शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे,

१. परवानगी _____ पासून _____ पर्यंत वैध राहील

२. सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारण्याचे काम _____ पर्यंत पूर्ण न झाल्यास, वरील परवानगीचा कालावधी वाढवून घेणे बंधनकारक आहे.

३. सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारणीचे काम परवानगी मिळण्याआधी सुरू झाल्यास कायदेशीर कारवाई करणे आवश्यक ठरेल.

४. ही परवानगी _____ उंची आणि_____प्रतल कोनासाठी वैध आहे.

सरकते जिने किंवा सरकते मार्ग उभारणी महाराष्ट्र उद्वाहने, सरकते जिने व सरकते मार्ग नियम, २०२६ याच्या तरतुदींनुसार पूर्ण करावी. सरकते जिने किंवा सरकते मार्गाच्या उत्पादक आणि कंत्राटदारांनी उक्त अधिनियम आणि त्याअंतर्गत केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसारच काम करावे. कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन झाल्यास उक्त अधिनियमाच्या कलम ३२ अन्वये त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

आपला नम्र,

अधीक्षक अभियंता

नमुना त्र

(नियम ६ (१) पहा)

उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गांची उभारणी व परिरक्षणासाठी कंत्राटदार अनुज्ञप्तीकरिता अर्ज

प्रति,
विद्युत निरीक्षक
.....

विषय: उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्गांची उभारणी व परिरक्षणासाठी कंत्राटदार अनुज्ञप्तीकरिता अर्ज

अर्जदाराचे पूर्ण नाव व पत्ता _____

विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्तीचे नाव व क्रमांक _____

कार्यालयाचा पत्ता_____

कार्यशाळेचा पत्ता _____

विद्युत पर्यवेक्षकाचे नाव व अनुज्ञप्ती क्रमांक _____

विद्युत अभियंत्याचे नाव _____

यांत्रिक अभियंत्याचे नाव _____

उभारणीचे काम करणाऱ्या कामगारांची संख्या_____

तंत्रज्ञांची संख्या _____

उभारणीसाठीचा आवश्यक कोटा_____

परिरक्षणासाठीचा आवश्यक कोटा_____

अर्जदाराची स्वाक्षरी

UNCOMPLYCATE Simplifying compliance

नमुना ट

(नियम ६(१) पहा)

मान्यता प्राप्त कंत्राटदाराच्या नियंत्रणाखाली काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी

अनु. क्र.	कर्मचाऱ्याचे नाव	अर्हतेचा तपशील	अनुभवाचा तपशील	कर्मचाऱ्याचा फोटो	कर्मचाऱ्याची स्वाक्षरी

प्राधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी
(परवाना क्रमांक व शिक्क्यासह)

UNCOMPLYCATED Simplifying Compliance

नमुना ठ

(नियम ६ (३) आणि ६ (५) पहा)

विद्युत कंत्राटदार अनुज्ञप्ती क्रमांक..... उद्वाहन, सरकते जिने व सरकते मार्ग कंत्राटदार अनुज्ञप्ती क्रमांक.....

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
उद्वाहने, सरकते जिने किंवा सरकते मार्ग
उभारणी आणि परिरक्षणासाठी विद्युत कंत्राटदारास अनुज्ञप्ती

